माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 3094 दिनांक :- 07/11/22

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०४/११/२२

१. अपिलकर्ता श्री.संतोष हनुमंत जगताप
राहणार :- गुरूप्रसाद अपार्टमेंट, रूम नं.१७,
त्रिमुर्ती चौक, कात्रज पुणे ४६.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता(विद्युत), परि क्र.४,
पुणे महानगरपालिका.

श्री. संतोष जगताप
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता(विद्युत), पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. संतोष जगताप यांनी दिनांक १५/०९/२०२२ रोजी जनमाहिती अधिकारी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता(विद्युत) पुणे महानगरपालिका यांचेकडे दि.१३/०९/२०२२ ते १५/०९/२०२२ रोजीची कार्यालयातील सी सी टि व्ही फुटेज मिळणेकामी अर्ज केला होता.

सदर अर्जात विचारले प्रमाणे इकडील सीसीटिव्ही यंत्रणा अंतर्गत सुरक्षा व देखरेखीकरिता बसविणेत आली असलेने सदरची मागणी पुणे शहर पोलीस यांच्याकडून करणेत आल्यास सदरची माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.२९९३ दि.३०/०९/२०२२ अन्वये मा.जन माहिती अधिकारी तथा, उप अभियंता(विद्युत) यांनी कळविले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १५/०९/२०२२ | १४/१०/२०२२ | ३०/०९/२०२२ | निरंक | ३०/०९/२०२२ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री.जगताप यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे- "अपुरी, दिशाभूल करणारी, खोटी माहिती देणेत आली. "

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २९/१०/२०२२ | १२/१०/२०२२ | होय | – | ३१/१०/२०२२ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि.०४/११/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | कार्यालयाकडील दि.१३/०९/२०२२ ते १५/०९/२०२२ रोजीचे कार्यालयातील सी सी टि व्ही फुटेज मिळणेकामी अर्ज केला होता. | सदर अर्जात विचारले प्रमाणे इकडील सीसीटिव्ही यंत्रणा अंतर्गत सुरक्षा व देखरेखीकरिता बसविणेत आली असलेने सदरची मागणी पुणे शहर पोलीस यांच्याकडून करणेत आल्यास सदरची माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.२९९३ दि.३०/०९/२०२२ अन्वये मा.जन माहिती अधिकारी तथा, उप अभियंता(विद्युत) यांनी कळविले. |

## विवेचन

सीसीटिव्ही यंत्रणा अंतर्गत सुरक्षा व देखरेखीकरिता बसविणेत आली असलेने सदरची मागणी पुणे शहर पोलीस यांच्याकडून करणेत आल्यास सदरची माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.२९९३ दि.३०/०९/२०२२ अन्वये मा.जन माहिती अधिकारी तथा, उप अभियंता(विद्युत) यांनी कळविले.

इकडील कार्यालयाकडील नागरी सुविधा केंद्र व विवाह नोंदणी विभागाकडे मोठ्या प्रमाणात आर्थिक रक्कमेचा भरणा असलेने सदर सीसीटीव्ही फुटेजचा गैरवापर होणेची शक्यता लक्षात घेता सदर फुटेज देणे धोक्याचे असलेने वरीलप्रमाणे जा.क्र.२९९३ दि.३०/०९/२०२२ अन्वये मा.जन माहिती अधिकारी तथा, उप अभियंता(विद्युत) यांनी कळविले असलेचे सांगितले.

## -: आदेश :-

अपिलकर्ता सदर सुनावणी कामी अनुपस्थित असून माहिती अधिकार अर्जात नमूद केलेप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अपिलकर्ता यांना प्रत्यक्ष पाहणेकामी उपलब्ध करून देवून त्यातील आवश्यक तेवढीच माहिती मा.जन माहिती अधिकारी तथा, उप अभियंता(विद्युत) यांनी अपिलकर्ता यांना आठ दिवसांचे कालावधीमध्ये देणेत यावी व त्याबाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

Dhotre 7/11/22

(डॉ.ज्योती धोत्रे)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः ०४/११/२०२२,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. अपिलकर्ता श्री.संतोष हनुमंत जगताप
राहणार :- गुरूप्रसाद अपार्टमेंट, रूम नं.१७,
त्रिमुर्ती चौक, कात्रज पुणे ४६.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता(विद्युत), परि क्र.४,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......